# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः30.01.2025** **वारःगुरुवार**

1. राष्ट्रीय अत्यावश्यक खनिज अभियानाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी, इथेनॉलच्या खरेदीसाठीचे हमीदरही जाहीर
2. राज्याचं गृहनिर्माण धोरण लवकरच
3. तिसऱ्या विश्व मराठी संमलेनाचं उद्यापासून पुण्यात आयोजन
4. पुण्यात गुइलेन बॅरे सिंड्रोममुळे आणखी एका महिलेचा मृत्यु, केंद्रीय आरोग्य पथकाद्वारे पाहणी, आणि
5. महाकुंभमेळयातील चेंगराचेंगरीत 30 जणांचा मृत्यू, 60 जण जखमी.

**<u>मंत्रिमंडळ निर्णय</u>**

राष्ट्रीय अत्यावश्यक खनिज अभियानाला काल केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली असून, या मोहिमेकरता 34 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद करण्यात आली आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत मंत्रीमंडळाच्या निर्णयांची माहिती दिली. महत्त्वाच्या खनिजांची आयात कमी करुन देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी अधिक उत्खनन आणि खाणींचं अधिग्रहण करण्याच्या उद्देशानं हे अभियान सुरु केलं आहे.

ऊसापासून काढलेल्या इथेनॉलच्या खरेदीसाठीचे हमीदरही कालच्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आले. त्यात सी दर्जाच्या मळीपासून काढलेल्या इथेनॉलकरता 57 रुपये 97 पैसे आणि बी दर्जाच्या मळीपासून काढलेल्या इथेनॉलकरता 60 रुपये 73 पैसे प्रति लीटर दर जाहीर झाला आहे. ऊसाचा रस, साखर आणि साखरेच्या सिरपपासून मिळणाऱ्या इथेनॉलकरता 65 रुपये 61 पैसे प्रतिलीटर दर जाहीर झाला आहे. इंधनात इथेनॉल मिसळल्यानं 1 लाख 13 हजार कोटी रुपये मूल्याच्या परदेशी चलनाची बचत होत असून, गेल्या वर्षात इथेनॉल खरेदीद्वारे शेतकऱ्यांना 40 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम देण्यात आल्याची माहिती अश्विनी वैष्णव यांनी यावेळी दिली.

**<u>उपमुख्यमंत्री</u>**

येत्या दोन वर्षात म्हाडाच्या माध्यमातून राज्यात सुमारे एक लाख घरांच्या उभारणीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील आणि यासाठी राज्याचं गृहनिर्माण धोरण देखील लवकरच जाहीर करण्यात येईल असं आश्वासन उपमुख्यमंत्री आणि गृहनिर्माणमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दिलं. पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळातर्फे पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीएसह सोलापूर जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण योजनेतील 3662 सदनिकांच्या विक्रीकरिता संगणकीय सोडत काल एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री तसंच पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत दूरस्थ पद्धतीनं काढण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. नव्या धोरणानुसार सर्वसामान्य नागरिक, काम करणाऱ्या महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ठिकठिकाणी वसतिगृहं उभारली जातील, असं त्यांनी सांगितलं.

**<u>जीबीएस पथक-सांगली</u>**

राज्यातील गुइलेन बॅरे सिंड्रोमची रुग्णसंख्या 127 वर पोहोचली असून, आणखी एका रुग्णाच्या मृत्यूची नोंद झाली आहे. ससून सर्वोपचार रुग्णालयात दाखल 56 वर्षीय महिलेला जीबीएसची लागण झाली होती. श्वसनक्रिया थांबण्यासह अर्धांगवायूमुळे त्यांचा मृत्यू झाल्याचं आरोग्य विभागानं सांगितलं. जीबीएसच्या रुग्णसंख्येत वाढ सुरू झाल्यापासून राज्यातील हा दुसरा मृत्यू ठरला आहे.

पुण्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमची रुग्णसंख्या वाढल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं नेमलेल्या उच्चस्तरीय पथकानं काल पुण्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. तसंच, ससून सर्वोपचार रुग्णालयाला भेट देऊन रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांसोबत बैठक घेतली. केंद्रीय पथकानं काल सिंहगड रस्ता परिसरातील पाण्याचा स्रोतांची पाहणी केली. या पथकानं रुग्णसंख्या वाढण्याच्या नेमक्या कारणांचा शोध सुरू केला आहे.

दरम्यान, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका आणि जिल्हा प्रशासनाकडून 'जीबीएस'बाधित भागांमध्ये घरांचं सर्वेक्षण करण्यात येत आहे. महापालिका आणि आरोग्य विभागानं यासाठी 86 पथकं तैनात केली आहेत. तसंच, बाधित गावांमध्ये मेडीक्लोरच्या बाटल्यांचं वाटप महापालिकेद्वारे केलं जात आहे.

सांगली जिल्ह्यात जीबीएस आजाराचे पाच संशयित रुग्ण तर एक रुग्ण कोल्हापूर जिल्ह्यात आढळून आला आहे. हे सहाही रुग्ण सांगलीत खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. याबाबत अधिक माहिती देताना सांगलीचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर विक्रमसिंह कदम म्हणाले....

**हे इन्फेक्शन होऊ नये म्हणून आपण सगळ्यांनी उकळून थंड केलेलं पाणी प्यावं जे शिळं अन्न असतंय असं खाऊ नये आपणाला जर असा एखादा ताप येऊन गेला संडाची लागण झाली आणि त्यानंतर जर आपणास जाणवलं की आपल्या पायामध्ये वीकनेस आहे आणि आपण आपल्याला अशक्तपणा जाणवतंय तर आपण त्वरित आमच्या आरोग्य संस्थे संपर्क साधावा आपल्याकडील प्राथमिक आरोग्य केंद्रापासून ते ग्रामीण रुग्णालय उपजिल्हा आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यामध्ये सगळ्या टीम तयार आहेत तर घाबरून न जाता त्वरित उपचार घ्यावेत कुठल्याही अफवावर विश्वास ठेवू नये. जर आपण या पद्धतीचा अवलंब केला तर निश्चितपणानं या आजाराला काही घाबरण्याचं कारण नाही**

**<u>विश्वमराठी</u>**

तिसऱ्या विश्व मराठी संमलेनाचं उद्यापासून तीन दिवस पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात आयोजन करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्या सकाळी अकरा वाजता संमेलनाचं उद्घाटन होणार आहे. यामध्ये साहित्य रसिकांसाठी विविध कार्यक्रमांची रेलचेल आहे. एक वृत्तांत....

**बालगंधर्व रंगमंदिरापासून फर्ग्युसन महाविद्यालयापर्यंत शोभायात्रेनंतर, उद्घाटन समारंभ, परिसंवाद- माझी मराठी भाषा अभिजात झाली, लेखक भास्कर हांडे लिखीत छत्रपती शिवाजी महाराज व्यक्तिचित्र तसंच बालभारतीच्या अभिजात मराठी विषयावरील 'किशोर' या अंकाचं प्रकाशन, मराठी भाषा आणि प्रसार माध्यमं, नव्या-जुन्यांचे कवी संमेलन, मराठीचा झेंडा अटकेपार, महाराष्ट्राची महासंस्कृती, मराठीच्या बोलींच्या सर्वेक्षणाबाबत सादरीकरण, अनुवाद विषयक चर्चासत्र, परिसंवाद कार्यक्रम होणार आहेत.**

**शनिवारी, 1 तारखेला महाराष्ट्र माझा-जाखडी, नमन, भारुड, गोंधळ, पोवाडा, पालखी, वाद्यांची जुगलबंदी, प्रशासनातील मराठी भाषा, परिसंवाद-समाज माध्यमांवरील प्रभावी व्यक्तीमत्वे, विज्ञान तंत्रज्ञानातील मराठीचा वापर, बाल साहित्याचा अविष्कार, परिसंवाद- नाटक, चित्रपटातील मराठी भाषा, स्वरसंध्या- अभिजात भावसंगीत, अभंग नाट्यसंगीताची सुरेल मैफिल, कार्यशाळा- व्यंगचित्रांची दुनिया (चिंटू) शालेय विद्यार्थ्यांसाठीचा विशेष कार्यक्रम, बालसाहित्याचा अविष्कार, परिसंवाद-वंदे मातरम : स्वातंत्र्य प्रेरणेची 150 वर्षे, महिला कायदा आणि महिलांना न्याय मराठी भाषेत, मराठी भाषेत कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर, कार्यशाळा: माध्यमांची लेखणी, आराधी लोकनृत्य, दिंडी लोकनृत्य, ज्ञानपीठाचे ज्ञानतपस्वी हे कार्यक्रम होणार आहे.**

**रविवारी, 2 तारखेला अभंगवाणी, मराठी उद्योजकांचे चर्चा सत्र, मराठी भाषा आणि स्त्री साहित्य, ग्रामीण वास्तव आणि मराठी साहित्य, मराठीचे ग्रंथ वैभव, मराठी भाषा आणि युवक, स्वरझंकार- मराठी संगीताचा बहारदार नजराना, बृहन्महाराष्ट्र मंडळ- सादरीकरण, अध्यात्मातील अभिजात मराठी, अभ्यासक्रमातील मराठी भाषा: वाटचाल, मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधी, त्यानंतर बालगंधर्व रंगमंदीरात सागरा प्राण तळमळला, आणि चाणक्य या कार्यक्रमांनी संमेलनाची सांगता होणार आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.**

**<u>विश्वमराठी संमेलन</u>**

केंद्र सरकारनं मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्यानंतर महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असणाऱ्या पुण्यातील हे पहिलं संमेलन असून, त्याद्वारे मराठी संस्कृती संवर्धनाचं काम होत असल्याचे कौतुकोद्गार विधान परिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी काल पुण्यात काढले. फर्ग्युसन महाविद्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

**कुंभमेळा**

उत्तरप्रदेशामध्ये प्रयागराज इथं महाकुंभमेळयात काल मौनी अमावस्येनिमित्त झालेल्या अमृत स्नाना दरम्यान भविकांमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीत 30 जणांचा मृत्यू झाला तर 60 जण जखमी झाले. महाकुंभचे पोलीस उप महानिरीक्षक वैभव कृष्णा यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मध्यरात्री भाविकांची प्रचंड गर्दी होऊन गोंधळ झाला आणि बॅरिकेट्स तुटल्यामुळे रस्त्यावर झोपलेले भाविक इतर भाविकांच्या पायाखाली येऊन जखमी झाले असं कृष्णा यांनी सांगितलं. त्यातल्या तीस जणांचा मृत्यू झाला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दुर्दैवी घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केल आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रति मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शोक संवेदना व्यक्त केली असून प्रत्येकी 25 लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे तसच या दुर्घटनेची तींन सदस्यीय समिती मार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

**स्नान-नाशिक**

मौनी अमावस्येचं निमित्य साधून काल नाशिकच्या रामकुंड परिसरात भाविकांनी स्नानासाठी गर्दी केली होती. नाशिक महापालिकेच्या वतीनं रामकुंड परिसरात भाविकांच्या सोयीसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

**राज्यपाल-नांदेड**

जग झपाट्यानं बदलत असून जगाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी विद्यापीठांनी नवनवीन अभ्यासक्रम सुरू करण्याची गरज असल्याचं राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. नांदेड इथं स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या २७ व्या दीक्षांत समारंभात ते काल बोलत होते. विद्यापीठात विविध भाषांचं ज्ञान दिल पाहिजे. नवीन शैक्षणिक शैक्षणिक धोरणांची योग्यप्रकारे अंमलबजावणी करावी, असं आवाहन देखील राज्यपालांनी केलं.

**कुस्ती-अहिल्यानगर**

अहिल्यानगरमधल्या वाडिया पार्क मैदानावर महाराष्ट्र केसरी स्पर्धेचं उद्घाटन काल पोपटराव पवार यांच्या हस्ते झालं. गादी आणि माती गटातील कुस्त्यांना काल सकाळी प्रारंभ झाला. या स्पर्धेसाठी विविध जिल्ह्यातून दोन्ही गटांमध्ये प्रत्येकी 20 पैलवान सहभागी झाले आहेत.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपल, नमस्कार.